# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट ३९३-२०२४** **दिनांक :- २४/१०/२०२४**

## “ मिसींग असलेली महीला व तिचे दोन्ही मुलास वाराणसी, उत्तरप्रदेश येथे शोधण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.”

मिसींग महिला नामे १) सुजाता मिथलेश चौधरी वय-४० वर्षे व त्यांची दोन मुले २)अभिजीत मिथलेश चौधरी वय-२२ वर्षे ३) आदीत्य मिथलेश चौधरी वय-१९ वर्षे तिन्ही रा. रुम क्र.०२, हनुमान मंदीरचे पाठीमागे, पेणकरपाडा, मिरारोड पुर्व असे तिघेही दिनांक ०५.०८.२०२४ रोजी ०८.०० वाजता राहते घरातुन कोणासही काहीही न सांगता कोठेतरी निघुन गेल्याने मिसींग इसमाचे पती व वडील नामे मिथलेश जोगी चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे मनुष्य मिसींग रजि.क्र. ८६/२०२४ प्रमाणे दिनांक ०५.०८.२०२४ रोजी दाखल आहे.

मिसींग महीला व तिची दोन्ही मुले यांचा गेले अडीच महीने पोलीसांना कोणताही ठावठिकाणा मिळुन येत नव्हता. तक्रारदार यांना त्याच्या पत्नी व मुलांचा अडीच महीन्यात काहीही संपर्क न झाल्याने त्यांचे कोणीतरी काहीतरी बरेवाईट केले असावे अशी भिती वाटू लागल्याने तक्रारदार यांनी गुन्हे शाखेशी संपर्क साधला. विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी सुचना दिल्याप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी राहुल राख यांनी पोउपनिरी. हितेंद्र विचारे, पोहवा. हनुमंत सुर्यवंशी असे तपास पथक तयार केले.

नमुद पोलीस पथकाने सदर मन्युष्य मिसींगची काशिमीरा पोलीस ठाणेतुन माहीती घेऊन त्यानुसार तांत्रिक व गोपनिय तपास करुन मेहनत घेवुन तपासात सातत्य ठेवून वरील तिन्ही मिसींग इसम हे वाराणसी, उत्तरप्रदेश येथे असल्याची माहीती गुप्त बातमीदाराकडुन तसेच तांत्रीक विश्लेषनवरुन मिळाली असता सदर ठिकाणी वरीष्ठांचे परवानगीने पोहवा/हनुमंत सुरेश सुर्यवंशी यांना रवाना करण्यात आलेले होते. पोहवा/ हनुमंत सुर्यवंशी यांनी वरील तिन्ही मिसींग इसमाचा रामनगर पोलीस ठाणे, जिल्हा वाराणसी, उत्तरप्रदेश येथील पोलीसांचे मदतीने शोध घेतला असता वरील तिन्ही मिसींग इसम हे भिटी सुलतानपुर, रामनगर, वाराणसी, उत्तरप्रदेश येथे मिळुन आले आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे व सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोनि धनंजय पोरे, सपोनि दत्तात्रय सरक, नितीन बेन्द्रे, पोउपनि हितेंन्द्र विचारे, सहापोउपनि श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा/हनुमंत सुर्यवंशी, संग्राम गायकवाड, शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, राजाराम काळे, संतोष मदने, सतिष जगताप,राजविर संधु, प्रविणराज पवार, महेश वेल्हे, अनिल नागरे, पोशि.साकेत माघाडे अखिल सुतार, नितीन राठोड, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी, सफौ.संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.

------oooo------